तरुण भारत
सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २८ मे २०२५

आतील पानावर

पान २–अनुष्का शर्मा बॉलीवूड सोडणार?
पान ३– कंगना दिसणार हॉलीवूडपटात
पान ४– रश्मिकासोबत काम करायला ...
पान ५– सोनालीने ट्रोलिंगवर व्यक्त केल्या भावना
पान ६– अफेअरच्या चर्चांवर सोनालीचे वक्तव्य



# उर्फीला सोशल मीडियापासून अलिप्त राहावं लागलं!

दि कान्स चित्रपट महोत्सवाचे यंदाही आयोजन मोठ्या दिमाखदार पद्धतीने केले हॉलीवूडसह बॉलीवूड कलाकारही या महोत्सवाला हजेरी लावत आहेत. नुकताच सोशल मीडियावर कान्सच्या रेड कार्पेटवरून अभिनेत्री उर्वशी रौतेलाचा फोटो व्हायरल झाला आहे. तिने परिधान केलेल्या आउटफिटीची चर्चा सोशल मीडियावर होत असताना मॉडेल उर्फी जावेदला हिला देखील कान्सला जायचं होतं पण तिचा व्हिसा रद्द झाल्याने तिला जात आलं नाही. याविषयी तिने सोशल मीडिया इन्स्टाग्रावर पोस्ट लिहित कान्सला जात आलं नसल्याची खंत व्यक्त केली आहे. उर्फी जावेदने इंस्टाग्रामवर एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टद्वारे तिने सांगितले की ती अलीकडच्या काळात कठीण काळातून जात होती. ती बऱ्याच काळापासून सोशल मीडियावर सक्रिय नव्हती, कारण तिच्यासोबत काही गोष्टी व्यवस्थित घडलेल्या नाहीत. तिला वारंवर इंडस्ट्रीत नकाराचा सामाना कारावा लागत होता. यामुळे तिने सोशल मीडियापासून अलिप्त राहणे पसंत केले असल्याचा खुलासा तिने स्वःत या पोस्टमधून केला आहे. उर्फी जावेदने लिहिले, मी गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियापासून दूर होते. मी काहीही अपलोड करत नव्हते. मी कुठेही दिसत नव्हते, कारण मी कठीण काळातून जात होते. माझा व्यवसाय चालत नव्हता. मी खूप वेगवेगळ्या गोष्टी करून पाहिल्या, पण प्रत्येक वेळी मला नकाराचा सामना करावा लागला. मला इंडे वाइल्ड मार्गे कान्सला जाण्याची संधी मिळाली, पण दुर्दैवाने माझा व्हिसा नाकारला गेला. मी आउटफिटवर काम करत होते, पण माझा व्हिसा नाकारल्यानंतर मी आणि माझी टीम खूप निराश झालो. अशी खंत तिने व्यक्त केली आहे. कदाचित माझ्यासारखेच, तुम्हालाही नकाराचा सामना करावा लागत असेल. जर तुमच्यासोबतही असे काही घडले असेल तर तुमची कहाणी शेअर करा. मी तुमची कहाणी माझ्या इन्स्टा स्टोरीवर शेअर करेन जेणेकरून लोकांना प्रेरणा मिळेल. असे देखील ती म्हणाली आहे.



# अनुष्का शर्मा बॉलीवूड सोडणार?



भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीने कसोटी सामन्यातून १२ मे २०२५ रोजी निवृत्तीची घोषणा केल्याने सर्वांनाच आश्चर्यचा धक्का बसला होता. बीसीसीआयने देखील विरोटची समजूत काढण्याचा प्रयत्न केल्याची बातमी समोर आली होती. पण त्याचा काहीही परिणाम झाला नाही. यामुळे १४ वर्षांचा कसोटी क्रिकेटमधील विराटचा प्रवास थांबला असल्याचे सांगितले जात आहे. अशातच आता क्रिकेटवर आधारित अनुष्का शर्माचा चकदा एक्सप्रेस हा चित्रपट लांबणीवर पडणार असल्याची बातमी समोर आली आहे. या चित्रपटातून अनुष्का बॉलीवूडमध्ये पुन्हा कमबॅक करणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या चित्रपटातून अभिनेत्री अनुष्का शर्मा भारतीय महिला क्रिकेटपटू झुलन गोस्वामी यांच्या भूमिका साकारणार आहे.

एका मुलाखतीत माजी क्रिकेटर झुलन गोस्वामी यांनी या त्यांचं मत व्यक्त केले आहे. मला याबद्दल काहीच माहिती नाही आणि सगळेजण मलाच विचारत आहेत. मला याबद्दल काहीच बोलायचं नाहीये. त्यामुळे आता चित्रपटाचे निर्माते यावर काय बोलणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. खरंतर हा चित्रपट २०२३ मध्ये रिलीज होणार होता. पण नंतर चित्रपट लांबणीवर पडला असून दोन वर्षांपासून या चित्रपटाची रिलीज डेट जाहीर करण्यात आलली नाही. त्यातच क्रिकेटर झुलन गोस्वामीने यावर भाष्य न करणार असल्याची प्रतिक्रिया विचार करायला लावणारी आहे. वृत्तानुसार, हा चित्रपट जवळपास पूर्ण झाला होता. काही व्हीएफएक्स शॉर्ट चित्रित करणं बाकी होतं पण त्यापूर्वीच या चित्रपटाचं काम बंद झालं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तांत्रिक मतभेत आणि चित्रपटाचं वाढतं बजेट यामुळे निर्मात्यांनी चित्रपटाकडे पाठ फिरवल्याची चर्चा आहे. मात्र, अद्यापर्यंत चित्रपटाच्या दिग्दर्शक आणि निर्मिती संस्थ्यांनी कोणतही अधिकृत विधान याबद्दल केलेलं नाही. तर दुसरीकडे अनुष्काने बॉलीवडूला रामराम केल्याची चर्चा देखील रंगू लागली आहे.


# परेश रावल यांच्याशिवाय 'हेरा फेरी-३' अशक्य!

अभिनेता 'हेरा फेरी ३' या चित्रपटाची घोषणा झाली तेव्हा चित्रपटाच्या चाहत्यांमध्ये आनंदाचं वातावरण निर्माण झालं होतं. अक्षय कुमार, सुनील शेट्टी, परेश रावल हे त्रिकूट पुन्हा एकत्र मोठ्या पडद्यावर झळकणार, अशी माहिती मिळाल्यामुळे चाहत्यांमध्ये त्याविषयी उत्सुकता होती. परंतु, काही दिवसांपासून या चित्रपटाबद्दल सुरू असलेल्या चर्चांमुळे आता प्रेक्षक नाराज झाले आहेत. 'हेरा फेरी', 'फिर हेरा फेरी' या चित्रपटांना खूप मोठ्या प्रमाणात यश मिळालं होतं. अशातच आता या चित्रपटाच्या तिसऱ्या भागाचं चित्रीकरण सुरू होणार होतं; परंतु इतक्यात परेश रावल यांनी या चित्रपटातून एक्झिट घेतल्याचं वृत्त समोर आलं. परेश रावल यांनी माध्यमांना दिलेल्या मुलाखतींमध्ये याबाबत खुलासा केला होता. त्यासह त्यांनी एक्सवर पोस्ट करीत याबद्दल त्यांची स्पष्ट प्रतिक्रिया दिली होती. दरम्यान, चित्रपटातील त्यांचे सहकलाकार अभिनेते सुनील शेट्टी यांनी परेश रावल यांच्या चित्रपटातील एक्झिटवर प्रतिक्रिया दिली आहे. सुनील शेट्टी म्हणाले, मी किंवा अक्षय कुमार नसलो तरी 'हेरा फेरी ३' चित्रपट बनवला जाऊ शकतो; पण परेश रावल यांच्याशिवाय हा चित्रपट बनवणं अशक्य आहे. सुनील शेट्टी यांनी यापूर्वी एका मुलाखतीमध्ये परेश रावल यांनी चित्रपटातून एक्झिट घेतल्याने त्यांना धक्का बसल्याचं म्हटलं होतं. ते म्हणाले, परेशनं चित्रपटातून एक्झिट घेतली याबद्दल मला माझ्या मुलांकडून कळलं. तोपर्यंत मला याबाबत काहीही माहीत नव्हतं. माझं कोणाशीही या संदर्भात बोलणं झालं नव्हतं. जेव्हा मला ही बातमी कळली तेव्हा मी त्याला मेसेज करणार होतो; पण आता भेटूनच यावर त्याच्याशी चर्चा करू, असं ठरवलं. दरम्यान, 'हेरा फेरी' चित्रपटाबद्दल बोलायचं झालं, तर २००० साली पहिल्यांदा 'हेरा फेरी' चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यामध्ये परेश रावल यांनी बाबू भैया,अक्षय कुमारने राजू, सुनील शेट्टी यांनी श्याम अशा तीन वेगवेगळ्या भूमिका साकारल्या होत्या. त्यावेळी त्यांनाही कदाचित याची कल्पना नसावी की, त्यांच्या या भूमिका अजरामर होणार आहेत.



# भारत-चीन युद्धावर येणार चित्रपट

अभिनेता सलमान खानचा 'सिकंदर' सिनेमा चांगलाच आपटला. त्याचे अनेक सिनेमे जोरदार आपटले आहेत. ॲटलीसोबतच्या त्याचा सिनेमाचीही चर्चा थांबली आहे. मात्र तरी त्याच्याकडे इतर अनेक बिग बजेट सिनेमे आहेत. त्यातच एक म्हणजे गलवान व्हॅली वादावर आधारित वॉर ड्रामा सिनेमात सलमान सैन्य अधिकार्‍याच्या भूमिकेत दिसणार आहे. सलमान खान लवकरच संजय दत्तसोबत 'गंगाराम' सिनेमात दिसणार आहे. शिवाय 'बजरंगी भाईजान २' सुद्धा सुरु होणार असल्याची चर्चा आहे. मात्र आता मिळालेल्या माहितीनुसार सलमान सर्वात आधी अपूर्व लखियाच्या दिग्दर्शनाखाली सिनेमाचं शूटिंग करणार आहे. रिपोर्टनुसार, पुढील पाच महिने सलमान गलवाल वॅलीत झालेल्या युद्धावरील सिनेमात व्यग्र असणार आहे. यामध्ये तो आर्मी





ऑफिसरच्या भूमिकेत आहे. सलमानने सिनेमा साईन केला असून लवकरच शूट सुरु होणार आहे. रिपोर्टमध्ये असंही म्हटलं आहे की सलमानला 'बजरंगी भाईजान २'चंही शूट करायचं होतं. मात्र कबीर खान या प्रोजेक्टपासून दूर राहण्याचा प्रयत्न करत आहे. त्याला सिनेमा दिग्दर्शित करायची इच्छा नाही. मात्र सलमानला कबीर खानच दिग्दर्शक हवा आहे. 'सिकंदर'नंतर सलमानकडे अनेक स्क्रिप्ट्स आल्या. त्यामध्ये त्याला गलवान व्हॅलीची कहाणीच जास्त आवडली. २०२० साली गलवान व्हॅलीमध्ये भारत आणि चीनदरम्यान झालेल्या युद्धावर सिनेमा आधारित आहे. दिग्दर्शक अपूर्व लखिया लवकरच शूटिंग शेड्युल फायनल करणार आहे. यानंतर सलमान या सिनेमातच व्यग्र होणार आहे. लद्दाखमध्ये सिनेमाचं शूट होणार असून सलमान खान स्वत: याची निर्मिती करेल अशीही चर्चा आहे.


# कंगना दिसणार हॉलीवूडपटात




बॉलीवूड अभिनेत्री कंगना रनौत आता हॉलीवूडमध्ये जाण्यासाठी सज्ज आहे. ती अनुराग रुद्र दिग्दर्शित 'ब्लेस्ड बी द एविल' चित्रपटात मुख्य भूमिका साकारू शकते. या चित्रपटात कंगना सोबत टीन वुल्फ, टायलर पोसी आणि हॉलीवूड आयकॉन सिल्वेस्टर स्टेलोनची मुलगी स्कारलेट रोज स्टेलोन असेल. या चित्रपटाची निर्मिती उन्हाळ्यातच न्यू-यॉर्क शहरात सुरु होईल. 'ब्लेस्ड बी द एविल' सायकोलॉजिकल हॉरर चित्रपट. या चित्रपटाचे दिग्दर्शन अनुराग रुद्र यांनी केले आहे. त्यांनी गाथा तिवारी यांच्यासोबत स्क्रिप्ट देखील लिहिली आहे. 'ब्लेस्ड बी द एविल' एक सायकोलॉजिकल हॉररपट आहे. एक ख्रिश्चन कपलवर केंद्रित आहे जे गर्भपाताच्या आघातामुळे संघर्ष करत आहे. एका नव्या शोधात, एक अंधार आणि भयावह इतिहास असणारे शेत खरेदी करतात. तिथे त्यांचा सामना एका दुष्ट शक्तीने होतो. चित्रपटाचे दिग्दर्शन अनुरागने आपले अनुभव शेअर करताना म्हटले, ग्रामीण भारतात जन्म आणि बालपण गेल्याने मला अशा कथा ऐकवल्या गेल्या, ज्या माझ्यात मनात राहून गेल्या. ही लोककथा इतकी खास होती की, मला वास्तवात या कथांवर विश्वास होता. मी त्यांना सिनेमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित करू इच्छितो.




# कार्तिकने सोडला करणचा चित्रपट



करण जोहर हा बॉलीवूडमधील प्रसिद्ध दिग्दर्शक व निर्माता आहे. त्याने आजवर अनेक सुपरहिट चित्रपटांचं दिग्दर्शन व निर्मिती केली आहे. 'दोस्ताना' हा चित्रपट त्यापैकीच एक. 'दोस्ताना' चित्रपटात अभिनेत्री प्रियांका चोप्रा, अभिषेक बच्चन, जॉन अब्राहम हे कलाकार मुख्य भूमिकेत झळकले होते. करण जोहरची निर्मिती असलेला हा चित्रपट २००८ साली प्रदर्शित झाला होता. त्याकाळी या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवरही चांगली कमाई केली होती. या चित्रपटातील गाणी त्याकाळी बरीच गाजली होती. 'दोस्ताना' चित्रपटाला प्रदर्शित होऊन एक दशकाहून अधिक काळ लोटला, तर गेल्या काही दिवसांपासून या चित्रपटाच्या पुढच्या भागाची चर्चा सुरू आहे. यापूर्वी या चित्रपटामध्ये अभिनेता कार्तिक आर्यन व जान्हवी कपूर झळकणार असल्याचं म्हटलं गेलं. परंतु, करण जोहरबरोबरच्या वैचारिक मतभेदामुळे कार्तिकने या चित्रपटात काम न करण्याचा निर्णय घेतला होता. अशातच आता या संदर्भातील नवीन माहिती समोर आली आहे. 'दोस्ताना २' मध्ये अभिनेता विक्रांत मॅसी झळकणार अशी चर्चा सुरू आहे. 'दोस्ताना २'मध्ये विक्रांत मॅसी कार्तिक आर्यनची रिप्लेसमेंट करणार असल्याचं म्हटलं जात आहे, तर जान्हवी कपूरच्या जागी कोणती अभिनेत्री झळकणार हे अद्याप समोर आलेलं नाही. 'पिंकव्हिला'च्या वृत्तानुसार करण जोहरची 'धर्मा' ही निर्मिती संस्था या चित्रपटाचं काम पाहत आहे; तर या चित्रपटात विक्रांत मॅसी व अभिनेता लक्ष्य लाल-वाणी पाहायला मिळणार असून या चित्रपटातील मुख्य नायिकेसाठी नवीन चेहर्‍याला पसंती दिली जाणार आहे. तर पुढच्या वर्षी जानेवारी २०२६ मध्ये चित्रपटगृहात हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. दरम्यान, विक्रांत मॅसीच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर काही दिवसांपूर्वीच त्याने तो अभिनय क्षेत्र सोडणार असल्याचं म्हटलं होतं. सोशल मीडियावर पोस्ट शेअर करीत कौटुंबिक कारणासाठी तो हे करत असल्याचं त्यानं म्हटलं होतं. परंतु, सध्या तो श्री श्री रविशंकर यांच्यावर आधारित चरित्रपटाच्या चित्रीकरणामध्ये व्यस्त आहे. यानंतर तो 'डॉन ३' मध्येही झळकणार आहे.



# रश्मिकासोबत काम करायला मला आवडेल



दाक्षिणात्य अभिनेता विजय देवरकोंडा हा त्याच्या चित्रपटांसह वैयक्तिक आयुष्यामुळे देखील चर्चेत असतो. लवकरच अभिनेता त्याचा आगामी चित्रपट 'किंगडम' च्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने विजय देवरकोंडा व्यस्त असल्याचा पाहायला मिळतोय. याचदरम्यान, दिलेल्या एका मुलाखतीमध्ये त्याच्या रिलेशनशिपबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर अभिनेत्याने दिलेल्या उत्तराने अनेकांचं लक्ष वेधलंय. मुलाखतीमध्ये विजय देवरकोंडाला इंडस्ट्रीत तो रश्मिका मंदानाला डेट करत असल्याच्या चर्चा आहेत. या बातम्या खऱ्या आहेत का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना अभिनेता म्हणाला, याबद्दल तुम्ही त्याच लोकांना विचारा. असं स्पष्ट शब्दांत सांगत अभिनेत्याने या अफवांचं खंडण केलं. त्यानंतर रश्मिका सोबत त्याच्या केमिस्ट्रीबाबत विजय देवरकोंडाने सांगितलं की, रश्मिकासोबत मी फारसे चित्रपट केलेले नाहीत. पण, मला तिच्याबरोबर आणखी काम करायला आवडेल. ती एक उत्तम अभिनेत्री आहे. ती एक सुंदर स्त्री आहे. त्यामुळे आमच्यामधील केमिस्ट्रीबद्दल वेगळं वाटण्यासारखं काही नाही. त्यानंतर पुढे अभिनेता म्हणाल, ती खूप मेहनती आहे. रश्मिका तिची इच्छाशक्ती आणि दृढनिश्चयाच्या बळावर कोणत्याही संकटावर मात करु शकते. याशिवाय ती खूप दयाळू आहे. सगळ्यात महत्वाचं म्हणजे ती स्वतः च्या सुखापेक्षा इतरांच्या सुखाला जास्त प्राधान्य देते. त्याचबरोबर विजयला लग्नाबद्दल विचारलं असताना तो म्हणाला, हो, कधीतरी मी नक्कीच लग्न करेन. त्यात आता अभिनेत्याच्या या वक्तव्याची सगळीकडे चर्चा होताना दिसते.

## समंथा आणि राजच्या नात्याबाबत खुलासा

दाक्षिणात्य अभिनेत्री समंथा रुथ प्रभु नेहमीच तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. गेल्या काही दिवसांपासून तिचे नाव दिग्दर्शक राज निदिमोरू यांच्यासोबत जोडले जात आहे. दोघे एकमेकांना डेट करत असल्याच्या अफवा पसरल्या होत्या. या बातम्यांमुळे सामंथाच्या चाहत्यांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले होते. काही दिवसांपूर्वी दोघांना एकत्रही पाहिले गेले होते. मात्र, आता या नात्याबाबत एक मोठा खुलासा झाला आहे. समंथा रुथ प्रभु आणि राज निदिमोरू यांच्या कथित प्रेमसंबंधांच्या बातम्यांनी माध्यमांमध्ये खळबळ माजवली होती. मात्र, या सर्व अफवांना पूर्णविराम देताना समंथाच्या व्यवस्थापकाने स्पष्ट केले की, या बातम्या केवळ अफवा आहेत आणि त्यात काहीही तथ्य नाही. राज आणि समंथा एकमेकांना डेट करत नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. गेल्या काही दिवसांपासून राज आणि समंथाच्या नात्याबाबत अनेक अफवा पसरल्या होत्या. एका वृत्तवाहिनीच्या दाव्यानुसार, राज निदिमोरू यांनी २००२ मध्ये त्यांच्या माजी पत्नी श्यामली यांच्याशी घटस्फोट घेतला आणि ते समंथासोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहण्यास इच्छुक होते. तसेच, त्यांना एक मुलगी असल्याच्याही बातम्या पसरल्या होत्या. मात्र, या सर्व अफवा असल्याचे स्पष्ट झाले आहे. समंथा रुथ प्रभु यांना अलीकडेच राज आणि डीके दिग्दर्शित 'सिटाडेल: हनी बनी' या वेब मालिकेत पाहिले गेले. यात ती वरुण धवनसोबत मुख्य भूमिकेत दिसली. सध्या ती 'रक्त ब्रह्मांड' आणि तेलुगू चित्रपट 'बंगारम' यावर काम करत आहे. याशिवाय, सामंथाने तिच्या प्रोडक्शन हाऊसअंतर्गत पहिला चित्रपट 'सुभम' प्रदर्शित केला आहे, ज्यामध्ये तिने एक छोटीशी भूमिकाही साकारली आहे. समंथा आणि राज यांच्या कथित नात्याबाबतच्या अफवांना आता पूर्णविराम मिळाला असून, चाहते तिच्या आगामी प्रोजेक्ट्सची आतुरतेने वाट पाहत आहेत.



# त्रिशाने 'ठग लाईफ' मधील 'त्या' सीनवर सोडले मौन

सुपरस्टार कमल हसन यांचा आगामी सिनेमा 'ठग लाईफ' सध्या चर्चेत आहेत. नुकताच 'ठग लाईफ'चा ट्रेलर रिलीज करण्यात आला. ट्रेलर रिलीज होताच कमल हसन आणि त्रिशा कृष्णन यांनी सर्वांचं लक्ष वेधलं आहे. कमल हसन यांचा त्रिशा कृष्णनसोबतचा रोमँटिक सीन सोशल मीडियावर वेगानं व्हायरल होत आहे. या सीनवर संमिश्र प्रतिसाद मिळाल्याचं पाहायला मिळालं. काहींनी ट्रोल केलंय तर काहींना या जोडीला पुन्हा एकत्र पाहून आनंद झालाय. यातच आता अभिनेत्रीनं कमल हासनसोबतच्या रोमान्सवरून होणार्‍या ट्रोलिंगला सडेतोड उत्तर दिलं आहे. कमल हसन ७० वर्षांचे आहेत. तर त्रिशा ४२ वर्षांची आहे. दोघांमध्ये तब्बल ३० वर्षांचं अंतर आहे. त्यामुळं या दोघांमध्ये इंटिमेट सीननं सर्वांची झोप उडवली आहे. अलिकडेच मुंबईत झालेल्या चित्रपटाच्या रिलीजपूर्व कार्यक्रमात त्रिशानं इंटिमेट सीनवर भाष्य केलं. ती म्हणाली, जेव्हा चित्रपटाची घोषणा झाली, तेव्हाचं मला माहिती होतं की हे जादुई असणार आहे. तेव्हा मी तो साइनही केलेला नव्हता आणि मी चित्रपटाचा भागही नव्हते. त्रिशाने मणिरत्नम आणि कमल हासन यांच्यासोबत काम करण्याचा अनुभवही शेअर केला. ती म्हणाली, ते दोघं सेटवर इतक्या सुंदर पद्धतीने काम करत होते की, आमचं सगळ्यांचं लक्ष फक्त त्यांच्याकडेच जात होतं. त्यांना पाहून आम्हाला वाटलं, अरे बापरे, आता आपण खरंच काम करायला हवं!.

'ठग लाईफ' हा चित्रपट गँगस्टरच्या प्रवासावर आधारित असून मणिरत्नम यांनी दिग्दर्शित केला आहे. त्यात कमल हसन आणि सिलंबरासन मुख्य भूमिकेत आहेत. तर त्रिशा कृष्णन, सान्या मल्होत्रा, अभिरामी, अशोक सेल्वन, ऐश्वर्या लक्ष्मी, जोजू जॉर्ज, नासेर, अली फजल, पंकज त्रिपाठी, रोहित सराफ आणि वैय्यापुरी महत्वाच्या भूमिकेत दिसत आहेत. सिनेमा आता येत्या ५ जून रोजी प्रदर्शित होणार आहे.



# सोनालीने ट्रोलिंगवर व्यक्त केल्या भावना



सोशल मीडिया आणि ट्रोलिंग हे समीकरण आता काही नवीन राहिलेलं नाही. सोशल मीडियावर नेटकऱ्यांकडून कलाकारांच्या अनेक चांगल्या गोष्टींचं कौतुक होतं. मात्र कौतुकापेक्षा अधिक आता ट्रोलिंगचं प्रमाणही वाढलं आहे. सोशल मीडियाद्वारे अनेक कलाकार त्यांचे फोटो, व्हिडीओ शेअर करत असतात. तसंच कामानिमित्तची माहिती देण्यासाठी ते या माध्यमाचा वापर करतात. पण अनेकदा या कलाकारांना ट्रोलिंग सहन करावं लागतं. सोशल मीडियावरील ट्रोलिंगकडे काही कलाकारांनी आता गप्प राहणंच पसंत केलं आहे. पण काही असे कलाकार आहेत, जे या ट्रोलर्सना योग्य शब्दांत स्पष्टपणे सुनावतात. अशातच या ट्रोलर्सबद्दल मराठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णीने प्रतिक्रिया दिली आहे. एका मुलाखतीत सोनालीने ट्रोलर्ससाठी एक सामुदायिक सभा घेऊन त्यांचं म्हणणं ऐकलं पाहिजे अशी प्रतिक्रिया दिली होती. तसंच या ट्रोलर्सच्या कमेंट्स फक्त नकारात्मकच का असतात? त्यांना सकारात्मक असं काही दिसत नाही का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला होता. याबद्दल सोनाली म्हणाली, तुम्ही या आणि व्यक्त व्हा की, तुम्हाला नक्की काय आवडत नाही. मी एके ठिकाणी बसून कलाकारावर कमेंट करणार की, काय कपडे घातले आहेत? हीच का आपली संस्कृती? मी हे लिहून मोकळी झाले. कुणाला इतका वेळ आहे की, हे लिहिणारी मी कोण आहे? याबद्दल जाणून घ्यायला. यानंतर सोनाली म्हणाली, त्यांचं असं असतं की, माझं अस्तित्व मी दाखवणार आणि मला खटकलेली गोष्ट मी बोलून दाखवणार. पण तसंच मला आवडलेली गोष्ट मी सांगते का? हा सुद्धा एक मुद्दा आहे. आपण हिरीरीने आक्षेप व्यक्त करतो. पण 'तो सिनेमा खुप सुंदर आहे, तुम्ही बघा' असं सांगतो का? आपल्याला एखादं चांगलं काही असेल तर ते का सांगावसं वाटत नाही. मग ते सगळं नकारात्मकच का असतं? असा प्रश्न तिने केला.

# 'जागरण'मध्ये अमृता सुभाष प्रमुख भूमिकेत



अनीस बज्मी हे बॉलीवूड इंडस्ट्रीतील एक प्रसिद्ध चित्रपट निर्माते आहेत. 'भूल भुलैया ३'च्या यशाने हिंदी चित्रपटसृष्टीतील त्यांचा दर्जा आणखी उंचावला. अनीस बज्मी 'वेलकम', 'सिंग इज किंग', 'नो एंट्री'सारखे चित्रपट बनवण्यासाठी ओळखले जातात. आता ते मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश करण्यास पूर्णपणे तयार आहेत. अनीस बज्मी 'जारण' नावाचा त्यांचा पहिला मराठी चित्रपट घेऊन येत आहेत. अनीस बज्मींच्या चित्रपटात अमृता सुभाष आणि अनिता दाते यांच्याबरोबर किशोर कदम, ज्योती मालशे, विक्रम गायकवाड, राजन भिसे, अवनी जोशी आणि सीमा देशमुख हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. 'जारण'ची कथा पाहिली तर ती प्राचीन काळातील अंधश्रद्धा, मानसिक संघर्ष आणि कुटुंबातील भावनिक चढ-उतार यांचे वर्णन करते. अनीस बज्मी म्हणाले, मी लहानपणी मुंबईत आलो आणि या राज्याने माझे जीवन आणि करिअर घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गेल्या काही वर्षांत मी मराठी चित्रपटांचे अद्भुत काम पाहिले आहे. मराठी चित्रपटांचा कंटेंट असो किंवा प्रतिभावान कलाकार असोत, सर्वकाही अद्भुत आहे. ते पुढे म्हणाले की, जेव्हा त्यांना 'जारण' मिळाला तेव्हा त्याची दमदार कथा आणि दिग्दर्शकाचे काम पाहून ते लगेच प्रभावित झाले. मराठी कलाकारांबरोबर काम केल्यानंतर, तो ज्या सिनेमाला प्रेक्षकांसमोर आणू इच्छितो त्याला पाठिंबा देणे आणि त्याचे प्रमोशन करणे ही एक जबाबदारी आहे असे वाटते. अनीस बज्मी म्हणाले, मी जेव्हा जेव्हा भारताबाहेर शूटिंग करतो, तेव्हा मला महाराष्ट्राची, माझ्या कर्मभूमीची, माझ्या घराची आठवण येते. इथे एक विशेष प्रकारची ऊर्जा आहे, एक लय आहे, जी माझ्या कामाला अधिक सकारात्मकता देते. निर्माते अमोल भगत म्हणाले, चित्रपटाच्या पहिल्या झलकेला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटाच्या सखोल कथेत प्रेक्षकांना अधिक गुंतवून ठेवणे हे आमचे उद्दिष्ट आहे. अमृता सुभाष, अनिता दाते आणि टीमचे काम अद्भुत आहे. 'जारण' हा चित्रपट ६ जून २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होईल.

# 'राजा शिवाजी' चित्रपटात झळकणार 'हा' अभिनेता

रितेश देशमुखने नुकतीच त्याच्या आगामी 'राजा शिवाजी' चित्रपटाच्या रिलीज डेटची घोषणा केली आहे. गेल्या काही दिवसांपासून हा ऐतिहासिक सिनेमा केव्हा प्रदर्शित होणार याची चाहते आतुरतेने वाट पाहत होते. मध्यंतरी शूटिंगच्या सेटवरचे रितेशचे फोटो देखील व्हायरल झाले होते. अखेर सर्व प्रेक्षकांची प्रतीक्षा आता संपली असून, शिवरायांची शौर्यगाथा सांगणारा 'राजा शिवाजी' हा ऐतिहासिक सिनेमा पुढच्या वर्षी १ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची अधिकृत घोषणा रितेशकडून करण्यात आली आहे. सिनेमाचं मोशन पोस्टर प्रदर्शित करून संपूर्ण जगभरात हा चित्रपट सहा भाषांमध्ये प्रदर्शित होईल असं रितेशने स्पष्ट केलं आहे. मराठी, हिंदी, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम या सहा भाषांमध्ये प्रेक्षकांना हा सिनेमा पाहायला मिळणार आहे. 'राजा शिवाजी' चित्रपटाच्या रिलीज डेटसह रितेशने यातील कलाकारांची नावंही जाहीर केली आहे. यामध्ये रितेशसह संजय दत्त, अभिषेक बच्चन, महेश मांजरेकर, सचिन खेडेकर, भाग्यश्री, फरदीन खान, जितेंद्र जोशी, अमोल गुप्ते आणि जिनिलीया देशमुख हे कलाकार महत्त्वाच्या भूमिका साकारणार आहेत. याशिवाय मालिकाविश्वातील आणखी एका अभिनेत्याची वर्णी या चित्रपटात लागली आहे. या अभिनेत्याने स्वत: पोस्ट शेअर करत याबद्दल माहिती दिली आहे. 'सुख म्हणजे नक्की काय असतं' या मालिकेतून घराघरांत लोकप्रिय झालेला अभिनेता कपिल होनराव रितेशच्या 'राजा शिवाजी' सिनेमात झळकणार आहे. कपिलने या मालिकेत मल्हार ही भूमिका साकारली होती. 'राजा शिवाजी' सिनेमाबद्दल कपिल म्हणतो, या भव्य चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली हे माझं भाग्य आहे. कपिल या सिनेमात नेमकी कोणती भूमिका साकारणार हे अद्याप त्याने उघड झालेलं नाही. सध्या अभिनेत्याचे मित्रमंडळी तसेच टेलिव्हिजन विश्वातून कपिलवर नव्या चित्रपटासाठी कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.



# गीतकार मजरूह सुलतानपुरी

## 'हम हैं राही प्यार के'



**पिया तू अब तो आजा, शोला सा मन दहके आके बुझा जा... हिंदी चित्रपटातील तत्कालीन प्रसिद्ध नृत्यांगना हेलन यांच्यावर चित्रित झालेले माफक शब्दात मादकता प्रकट करणारे हे गीत लिहिण्यासाठी राहुल देव बर्मन यांना जुन्या पिढीतील मजरूह सुलतानपुरी यांची गरज पडली. यातच मजरूह यांचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. मजरूह यांनी प्रत्येक पिढीतील बदल स्वीकारून आपली काव्य प्रतिभा प्रदर्शित केली.**

भारतीय बोलपटाचे युग कुंदनलाल सैगल यांनी सुरू केले. सैगल युगानंतर स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुमारास देव आनंद, राज कपूर व दिलीप कुमार हे नवीन युगाचे प्रवर्तक ठरले. त्यानंतरचे युग राजेश खन्ना, अमिताभ बच्चन यांचे होते. या तीनही युगाचे साक्षीदार मजरूह होते. गम दिए मुस्तकिल, कितना नाजुक है दिल ये न जाना १९४६ साली मजरूह यांनी पदार्पणातच दिग्गज सैगलवर चित्रित झालेले गीत लिहून बहुमान प्राप्त केला. स्वतः सैगल यांना प्रिय असलेले गीत इच्छेनुसार त्यांच्या अन्त्ययात्रेतही वाजविले होते... जब दिलही टूट गया अब जी के क्या करेंगे हे गाणे सैगल साहेबांची ओळख ठरले.

खऱ्या अर्थी चित्रपटाच्या नव्या युगाचे प्रवर्तक गीतकार म्हणून मजरूह व प्रवर्तक संगीतकार म्हणून नौशाद हेच ठरले. वास्तविक मजरूह हे तत्कालीन मशहूर गझलकार होते. त्यांनी म्हटले होते की, तरक्की पसंद का दौर वो और था, जब सारे अदिब शायर हमारे समाज को बेहतर बनाने की कोशिश कर रहे थे. त्यांनीही याच कारणास्तव सिनेमाद्वारे गझलस्वरूप गाणी लिहिलीत. तुझे क्या सुनाऊ मै दिलरुबा, तेरे सामने मेरा हाल है... आपली गरिबी लपविण्याच्या प्रयत्नात १९५७ च्या 'आखरी दाव' चित्रपटात नायक (शेखर) आपल्या प्रेयसीसमोर (नूतन) अपयशी ठरतो. त्याची टिंगल उडविली जाते. तेव्हा तो नायिकेला वरील विनंती करतो. श्याम-ए-गम की कसम आज गम ही है गम १९५३ सालच्या 'फुटपाथ' चित्रपटात दुःखाने ग्रासलेला नायक आपल्या व्यथा मजरूह यांच्या शब्दात वर्णन करतो. तलत मेहमूद यांनी मुलायम स्वरात गावून मजरूह यांच्या शब्दाला योग्य न्याय दिला आहे. वो जो मिलते थे कभी हमसे दिवानो की तरह आज यूं मिलते है कहते कभी पहचान न थी. लता मंगेशकर यांनी कोकीळ स्वरात दुःखाचे सारण भरून कवीचे हे गझल स्वरूप गाणे अजरामर केले. १९६३ सालच्या 'अकेली मत जइयो' चित्रपटातील मदन मोहन यांच्या साजात हे गाणे सजले आहे.हम है राही प्यारके, हमसे कुछ ना बोलिये जो भी प्यार से मिला. हम उसीके हो लिये... खिलाडू वृत्तीचे सदाबहार नवीन युगाचे प्रवर्तक 'देव आनंद यांनी पडद्यावर मजरूह यांच्या शब्दांना आपल्या अभिनयाने सार्थ केले. नायिकेला छेडताना ते आपली बेफिकरी प्रकट करतात. अच्छा जी मै हारी, देखो मान जावो ना... नटखट अदाकारीच्या खटक्याचे गाणे 'काला पाणी' चित्रपटातले. साधारणपणे गाण्यात नायक नायिकेला चिडवीत असतो. मजरूह यांनी याउलट प्रकार अस्तित्वात आणला.

प्रत्येक कडव्यातील शेवटले अंतरे पहा- (१) छोड दिया तो हाथ मलोगे समझे! (२) चार कदम भी चल न सकोगे समझे (३) हम न रहे त याद करोगे समझे. असाच प्रकार खालील दोन गाण्यात मिश्कीलपणे हाताळला आहे. दिवाना मस्ताना हुवा दिल, जाने कहाँ होके बहार आयी 'बंबई का बाबू' या चित्रपटात सौंदर्यखणी सुचित्रा सेन यांनी मदनरूपी देव आनंदला चिडवण्याचा प्रकार, तसेच- देखो कसम से, देखो कसम से कह ते है तुमको हा... 'तुमसा नही देखा' या चित्रपटातील या गाण्यात नायिका अमिता नायक शम्मी कपूरला चिडविते. ती म्हणते- क्या लगाई तुमने इस कसम कसम से लो ठहर गये हम, थाम लो जी हमसे... मजरूह यांनी या गाण्यात 'कसम से' शब्दाचा वापर १५-२० वेळा करून काव्यात नवीन प्रकार रुजवला. बाबूजी धीरे चलना प्यार मे जरा संभालना १९५४ सालच्या 'आरपार' चित्रपटात संगीतकार ओ. पी. नय्यर यांनी या गाण्यात जादुई ठेक्याने व अकॉरडियनच्या मस्तीत गुंजणाऱ्या गीता दत्तच्या आवाजात मजरूह यांचे शब्द अक्षरशः डोलायमान करून अप्रतिम गाणे जन्माला घातले. मिलता है यहाँ सबकुछ पर मिलता नही दिल हे सांगायलाही कवी मजरूह विसरले नाहीत. आधीच्या युगातील नौशाद, ओ. पी. नय्यर, सचिनदा आदींना त्यांना साजेशा शब्दांच्या शेकडो रचना देऊन त्यांची गाणी अमर केल्यानंतर ७० च्या युगात उदयास आलेले लक्ष्मीकांत प्यारेलाल या संगीतकाराला मजरूह या अनुभवी गीतकारांनी संजीवनी दिली. त्यांच्या १९६५ च्या 'दोस्ती' चित्रपटासाठी सर्वच गाणी अप्रतिम व दर्जेदार काव्याचा नमुना ठरली. 'चाहूंगा मै तुझे...' या गाण्यासाठी गीतकाराचा १९६५ सालच्या 'फिल्म फेअर' पुरस्काराने मजरूह सुलतानपुरी पुरस्कृत झाले. मजरूह सुलतानपुरी या महान गीतकाराने १९४६ पासून २००० पर्यंत बहुतेक सर्वच संगीतकारांसाठी ३०० च्या वर चित्रपटात २००० पेक्षा अधिक गाणी लिहून चित्रपटसृष्टीला आपले अमूल्य योगदान दिले. अखेरच्या काळात नवीन संगीतकार जतीन ललितसाठीही गाणी लिहून याही पिढीत आपला करिष्मा दाखविला. गीतकार म्हणून त्यांचा अखेरचा चित्रपट 'वन टू का फोर' होता; जो २००१ साली त्यांच्या मृत्युपश्चात प्रदर्शित झाला.

१ ऑक्टोबर १९१९ रोजी सुलतानपूर येथे असरार उल हसन खान यांचा जन्म झाला. 'मजरूह' हे टोपण नाव व 'सुलतानपुरी' हे गावाच्या नावावरून घेतले. १९४९ साली काही राजकीय आरोपावरून त्यांना दोन वर्षांचा कारावास पत्करावा लागला होता. राज कपूर व राजेंद्रसिंग बेदी या कलावंतांनी या काळात त्यांना खूप मदत केली. १९५०-६० च्या दशकात भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रमुख संगीत शक्तीपैकी ते एक होते. त्याचप्रमाणे प्रगतिशील लेखक व कविक्षेत्रातील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व होते. १९६५ साली त्यांना गीतकार क्षेत्रात एकमेव फिल्मफेअर अवॉर्ड मिळाला. १९८० साली इकबाल सन्मान. १९८० साली उर्दू शायरीसाठी- गालिब अवॉर्ड. १९९३ साली चित्रपटातील महान योगदानाचा सर्वश्रेष्ठ दादासाहेब फाळके अवॉर्ड मिळाला. भारतीय चित्रपटातील थोर गीतकार मजरूह सुलतानपुरी यांनी चित्रपटसृष्टीला भरभरून योगदान देऊन सोनियाचा दिन दाखविला. २४ मे २००० रोजी मुंबई मुक्कामी ते पैगंबरवासी झाले. स्वतःसाठी लिहिलेला त्यांचा एक शेर-मैं अकेला ही चला था जानिबे मंझिल मगर, लोग साथ आते गये, कारवा बनता गया...

रमेश पोफळी

# राणी मुखर्जी 'किंग' चित्रपटात करणार कॅमिओ?



अभिनेता शाहरुख खान सध्या त्याच्या आगामी 'किंग' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात शाहरुख लेक सुहाना खानसोबत दिसणार आहे. यातच आता या चित्रपटाबाबत आणखी एक अपडेट समोर आली आहे. यात अभिनेत्री राणी मुखर्जी देखील पाहायला मिळणार आहे. १९ वर्षानंतर राणी मुखर्जी आणि शाहरुख पुन्हा एकत्र स्क्रिन शेअर करताना दिसणार आहेत. राणी मुखर्जी शाहरुख खानच्या किंगमध्ये दिसणार आहे.

राणी मुखर्जी चित्रपटात कॅमिओ करणार आहे. परंतु यात तिचीही भूमिका महत्वाची असणार आहे. यानंतर चाहत्यांची देखील उत्सुकता वाढली आहे. परंतु याबाबत चित्रपटाचे निर्माते किंवा कलाकारांनी देखील कोणताही अधिकृत माहिती दिलेली नाही. बहुचर्चित 'किंग' चित्रपटात शाहरुख खानसह सुहाना खान, दीपिका पदुकोण, अभिषेक बच्चन, अभय वर्मा, अनिल कपूर, जॅकी श्रॉफ आणि अर्शद वारसी हे कलाकार सुद्धा पाहायला मिळणार आहेत.

राणी मुखर्जी आणि शाहरुख खान यांनी 'कुछ कुछ होता है', 'चलते चलते', 'पहेली', 'कभी खुशी कभी गम' आणि 'कभी अलविदा ना कहना' यांसारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. राणीने 'रब ने बना दी जोडी' आणि 'झिरो'मध्येही कॅमिओ केले होते. पण 'कभी अलविदा ना कहना' हा त्यांचा शेवटचा चित्रपट होता, ज्यामध्ये ते सुरुवातीपासून शेवटपर्यंत एकत्र दिसले होते. आता ते पुन्हा एकत्र काम करण्यासाठी सज्ज झाले आहेत. राणी मुखर्जीच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले, तर 'किंग' व्यतिरिक्त 'मर्दानी ३' मध्ये देखील ती दिसणार आहे.

# सलमानची गर्लफ्रेंड करतेय अभिनय क्षेत्रात पदार्पण

बॉलीवूड अभिनेता सलमान खानची कथित गर्लफ्रेंड लुलिया वंतूरबद्दल एक बातमी समोर येत आहे, जी ऐकून चाहते नक्कीच आनंदी होतील. रोमानियन मॉडेल व गायिका लुलिया वयाच्या ४४ व्या वर्षी अभिनयाच्या जगात प्रवेश करणार आहे. लुलिया वंतूरने अनेक म्युझिक व्हिडीओंमध्ये तिच्या डान्सने चाहत्यांना मंत्रमुग्ध केले आहे. आणि आता ती चित्रपटांमध्येही काम करण्यास पूर्णपणे तयार आहे. लुलियाच्या पदार्पणाच्या शॉर्ट फिल्मची घोषणा झाली आहे. लुलिया बॉलीवूड चित्रपटातून नाही तर एका इंग्रजी शॉर्ट फिल्ममधून पदार्पण करणार आहे. लुलियाने ५ मे २०२५ रोजी चित्रपट समीक्षक तरण आदर्श यांची एक पोस्ट रीशेअर केली आहे. या पोस्टमध्ये लुलियाच्या पदार्पणाची बातमी आहे. पोस्टमध्ये लिहिले होते, लुलिया वंतूर एका इंग्रजी शॉर्ट फिल्ममधून अभिनय क्षेत्रात पदार्पण करीत आहे. दिग्दर्शक जो राजन यांनी 'इकोज ऑफ अस'चे शूटिंग सुरू केले आहे. ही पोस्ट समोर येताच सोशल मीडियावर या शॉर्ट फिल्मबद्दल चर्चा सुरू झाली. लुलिया तिच्या पहिल्याच शॉर्ट फिल्ममध्ये मुख्य भूमिकेत आहे. या शॉर्ट फिल्ममध्ये तिच्याबरोबर दीपक तिजोरी मुख्य भूमिकेत आहे. लुलिया आणि दीपकव्यतिरिक्त स्पॅनिश अभिनेत्री अलेस्सांड्रा व्हेलन मेरेडिझ या शॉर्ट फिल्ममध्ये दिसणार आहे. अभिनेत्री पूजा बत्रा या शॉर्ट फिल्मची निर्मिती करीत आहे. शेअर केलेल्या दोन फोटोंपैकी पहिल्या फोटोमध्ये लुलिया दीपकला मिठी मार-ताना दिसत आहे आणि दुसर्या फोटोत ती टीमच्या इतर सदस्यांबरोबर दिसत आहे. लुलिया वंतूर आणि सलमान खान यांच्या नात्याबद्दल अनेक वेळा चर्चा रंगली आहे. मात्र, त्यांनी कधीही यावर वक्तव्य केलेलं नाही. तरीही लुलिया अनेक वेळा सलमान खानला तिच्या करिअरमधील यशासाठी श्रेय देते. सलमानच्या कुटुंबाबरोबर लुलियाचे चांगले संबंध असल्याने सलमान आणि तिच्या नात्याची चर्चा होते.



# अफेअरच्या चर्चांवर सोनालीचे वक्तव्य



अभिनेत्री सोनाली बेंद्रे सध्या चित्रपटांपासून दूर असली तरीही ओटीटीच्या माध्यमातून ती प्रेक्षकांच्या भेटीला येत असते. तिचा आजही मोठा चाहतावर्ग आहे. त्याबरोबरच अभिनेत्री सध्या तिच्या वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे. सोनाली बेंद्रेने एका मुलाखतीत सहकलाकारांबरोबर अनेकदा तिचे नाव जोडले जाते, तसेच बरोबरीच्या लोकांचा दबाव असतो, त्याला ती कशी सामोरी गेली, यावर वक्तव्य केले. अभिनेत्री म्हणाली, मी माझ्या अनुभवांमधून शिकत गेले. मी त्याच चुका परत केल्या नाहीत. मी एकच चूक कधीच दुसऱ्यांदा केली नाही. एखाद्या गोष्टीतून मला धडा मिळाला आणि तशा गोष्टी कशा हाताळायच्या समजले की, मग पुढच्या वेळी त्या गोष्टी घडायच्या नाहीत. सोनालीने असेही सांगितले की, बाल-पणात मला अनेक शहरे, अनेक शाळा बदलाव्या लागल्या. त्यामुळे मी होणाऱ्या बदलांशी सहजपणे जुळवून घेऊ शकले. नवीन वातावरणा-शी जुळवून घेण्यास शिकले. तसेच मी स्वत:ला स्वावलंबी बनवले. आसपासच्या लोकांच्या कौतुकाची गरज वाटली नाही. तसेच, दबावही जाणवला नाही. सहकलाकारांबरोबर अनेकदा नाव जोडले जाते, त्यावर बोलताना अभिनेत्री म्हणाली, मला याची जाणीव झाली की, ही कधी कधी ती पत्रकाराची कल्पनाशक्ती असते. आजकाल 'क्लिकबीट'बद्दल बोलले जाते. तो काळ हेडलाइन्सचा होता. हेडलाइनवरून पेपर विकले जायचे. पण, अनेकदा असेही होते की ,निर्मात्याला प्रसिद्धी हवी असते. किंवा कलाकारांना स्वत:बद्दल चांगले वाटून घ्यायचे असते. त्यामुळे अशा गोष्टींची चर्चा होता. अशा चर्चा होण्याची अनेक कारणे आहेत. त्यामुळे कोणा एका व्यक्तीला दोष देता नाही. तो त्या त्या क्षेत्राचा भाग असतो, त्याचे परिणाम असतात. त्याच क्षेत्राने मला प्रसिद्धी, पैसा व काम दिले आहे. सोनाली बेंद्रे नुकतीच बी हॅप्पी' या चित्रपटात दिसली होती. या चित्रपटात अभिषेक बच्चन, नोरा फतेही, इनायत वर्मा हे कलाकार प्रमुख भूमिकांत आहेत. प्राइम व्हिडीओ या प्लॅटफॉर्मवरील या चित्रपटाचे प्रेक्षकांकडून कौतुक झाले. आता ती लवकरच एका वेब सीरिजमध्ये दिसणार आहे. तिच्याबरोबर अली फजल मुख्य भूमिकेत दिसणार आहे.

# 'अखंडा २-तांडवम'मध्ये विद्या बालन

दाक्षिणात्य सुपरस्टार नंदमुरी बालकृष्ण आणि दिग्दर्शक बोयापति श्रीनु यांचा चित्रपट 'अखंडा'च्या दुसऱ्या भागाची घोषणा करण्यात आली आहे. आता या चित्रपटात एका बॉलिवूड अभिनेत्रीची एंट्री झाली आहे. नंदमुरी बालकृष्ण सध्या 'अखंडा २ तांडवम'चे चित्रिकरण करत आहेत. बोयापति श्रीनु यांच्या दिग्दर्शनात हा चित्रपट तयार केला जात आहे. या चित्रपटात आता एका भूमिकेसाठी बॉलिवूड अभिनेत्री विद्या बालन हिची निवड करण्यात आली आहे. या चित्रपटात ती एका राजकारण्याची भूमिका साकारणार आहे. बालकृष्ण यांच्यासोबतचा तिचा हा दुसरा चित्रपट असेल. यापूर्वी तिने एनटीआर यांच्या बायोपिकमध्ये त्यांच्यासोबत काम केले आहे. निर्मात्यांनी अखंडा २ चित्रपटाचे पोस्टर जारी केले आहे. हा चित्रपट पॅन इंडिया स्तरावर प्रदर्शित केला जाणार आहे. हा चित्रपट हिंदी, इंग्रजीसोबत अनेक भाषांमध्ये पाहता येणार आहे. चित्रपटात प्रज्ञा जैसवाल मुख्य भूमिकेत दिसून येणार आहे. चित्रपटाची निर्मिती १४ रील्स प्लस बॅनर अंतर्गत राम अचंता आणि गोपीचंद अचंता यांनी केली आहे. चित्रपटाला थमन यांचे संगीत लाभले असून हा चित्रपट २५ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे.





बॉलीवूड अभिनेत्री दीपिका पादुकोण सध्या तिची मुलगी दुआबरोबर वेळ घालवत आहे. ती व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्य यामध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न करीत आहे. अशातच अभिनेत्री सध्या चर्चेत आली आहे. दीपिका पादुकोण संदीप रेड्डी वांगा यांच्या 'स्पिरिट' या चित्रपटामध्ये झळकणार होती. या चित्रपटामध्ये अभिनेता प्रभास, अभिनेत्री त्रिशा कृष्णन, कियारा अडवानी यांसारखे कलाकार झळकणार आहेत. पण, नुकत्याच समोर आलेल्या बातमीनुसार 'स्पिरिट' या चित्रपटातून दीपिका पादुकोणची एक्झिट झाली असल्याचं वृत्त समोर आलं आहे. संदीप रेड्डी वांगा यांना दीपिकाची काम करण्याची पद्धत कळल्यानंतर त्यांना आश्चर्य वाटलं होतं. कारण- दीपिका दिवसाला केवळ सहा तास काम करणार, असं तिच्या एजन्सीकडून त्यांना सांगण्यात आलं होतं. एवढंच नव्हे, तर १०० दिवसांहून अधिक दिवस चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी लागले, तर त्या प्रत्येक दिवसाचे त्यांना तिला पैसे द्यावे, असं लिहिलेलं. या संदर्भातील कराराही दीपिकाला करायचा होता. संदीप रेड्डी वांगा यांनी चित्रपटाच्या निर्मात्यांशी या संदर्भात चर्चा करून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यावर कोणताच तोडगा निघाला नाही. दीपिकाच्या गरोदरपणामुळे तिला या चित्रपटातून बाहेर पडण्याचा निर्णय घ्यावा लागत आहे. पण, त्यानंतर संदीप रेडी वांगाने वेळापत्रकात बदल केल्यानंतर ती या चित्रपटात काम करण्यासाठी तयार झाले होती. अशातच आता ती या चित्रपटामधून बाहेर पडल्याचं वृत्त समोर आलं आहे. दरम्यान, १४ नोव्हेंबर २०१८

# दीपिका पादुकोणची 'स्पिरिट'मधून एक्झिट

रोजी दीपिका व रणवीर सिंह यांनी लग्न केलं होतं. लग्नाच्या जवळपास पाच वर्षांनी या जोडीने आई-बाबा होण्याचा निर्णय घेतला. पुढे दीपिकाने ८ सप्टेंबर २०२४ रोजी एका गोंडस मुलीला जन्म दिला. सध्या दीपिका मुलीबरोबर वेळ घालविताना दिसत आहे. तिच्या आगामी कामाबद्दल बोलायचं झालं, तर ती 'कल्कि २८९८ ए. डी', 'ब्रह्मास्त्र भाग २ : देव' या आगामी चित्रपटांमध्ये झळकणार आहे. त्यासह ती 'स्पिरिट' या चित्रपटातही झळकणार होती. परंतु, नुकतंच तिनं या चित्रपटातून एक्झिट घेतल्याचं वृत्त समोर आलं आहे. अद्याप याबाबत तिनं कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही.


# श्रद्धाने मानधनासाठी नाकारला चित्रपट?



बॉलिवूडच्या सध्या काही टॉपच्या अभिनेत्रींमध्ये अग्रक्रमी येणारी अभिनेत्री म्हणजे श्रद्धा कपूर. आपल्या निरागस अभिनय आणि सौंदर्याने ही अभिनेत्री कायमच चर्चेत राहत असते. 'स्त्री २' या चित्रपटाच्या यशानंतर तिच्या लोकप्रियतेत आणि प्रसिद्धीत खूपच वाढ झाली आहे. तसंच यामुळे तिच्या मानधनात बरीच वाढ झाल्याचं म्हटलं जात आहे. त्यामुळे ती आता खूप विचारपूर्वक चित्रपट निवडते. दरम्यान, तिने एकता कपूरच्या चित्रपटाची ऑफर नाकारल्याच्या अनेक बातम्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. राही अनिल बर्वे दिग्दर्शित आणि एकता कपूर निर्मित थ्रिलर चित्रपटात श्रद्धाला कास्ट करण्यात आलं होतं. पण सोशल मीडियावर अशा बातम्या येत आहेत की, मानधनाच्या वादातून श्रद्धा हा चित्रपट सोडत आहे. वृत्तानुसार, श्रद्धाने चित्रपटाच्या नफ्यातील वाट्यासह १७ कोटी रुपये मागितल्याचं म्हटलं आहे. जे निर्मात्यांना जास्त वाटलं; ज्यामुळे मतभेद निर्माण झाले. या बातमीवर आपले मौन सोडत 'तुंबाड' चित्रपटाचे दिग्दर्शक राही अनिल बर्वे यांनी या केवळ अफवा असल्याचे म्हटलं आहे. याबद्दल त्यांनी पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमधून त्यांनी श्रद्धा कपूर चित्रपटातून बाहेर पडण्याच्या वृत्तांवर थेट भाष्य केलं नसलं, तरी 'अफवांवर विश्वास ठेवू नका' असं आवाहन केलं आहे. या पोस्टमध्ये ते असं म्हणतात, कृपया सध्या मीडियामध्ये पसरणाऱ्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका. आम्ही योग्य वेळी अधिकृत घोषणा करू. धन्यवाद. श्रद्धा कपूर चित्रपट सोडण्याच्या बातम्या केवळ अफवा असल्याचे दिग्दर्शकाने म्हटले आहे. यावेळी ते असं म्हणाले की, सध्या मी रक्त ब्रह्मांड या वेबसीरिजवर काम करत आहे. दरम्यान, श्रद्धाने केलेल्या अधिकच्या मानधनाच्या मागणीमुळे चित्रपटाचे बजेट बिघडले आणि म्हणूनच निर्माते आता नवीन अभिनेत्रीच्या शोधात आहेत. एकता कपूर आता काही इतर टॉप अभिनेत्रींशी बोलत आहे. त्यामुळे लवकरच या चित्रपटाला एक नवीन नायिका मिळणार असल्याचे वृत्त आहे.

बॉलिवूड अभिनेत्री निम्रत कौर ही तिच्या हटके भूमिकांसाठी ओळखली जाते. अनेकदा ती तिच्या वक्तव्यांमुळेदेखील चर्चेत असते. आता अभिनेत्री निम्रत कौरने एका मुलाखतीत तिच्यावर घरच्यांकडून लग्न करण्याचा दबाव होता, असे वक्तव्य केले आहे. निम्रत कौरने एका मुलाखतीत केलेले वक्तव्य सध्या चर्चेत आहे. अभिनेत्री म्हणाली, मी चित्रपटसृष्टीत काम करीत होते. माझ्या कुटुंबीयांना वाटत होते की, मी माझा छंद जपत आहे. त्यानंतर मी लग्न करेन आणि संसारात रमेन. जेव्हा मी इरफान खान यांच्याबरोबर 'लंचबॉक्स' या चित्रपटात काम केले. तेव्हा माझ्या घरच्यांनी माझ्या करिअरला गांभीर्याने घेतले. त्याआधी

# मी माझं लक्ष करिअरवर केंद्रित केलंय



मी लग्न करावे, असेच त्यांना वाटत होते. इरफान खान यांच्याबरोबर काम केल्यानंतर त्यांना खात्री पटली की, मी या क्षेत्रात काम करू शकते. निम्रत कौर तिच्या संघर्षाच्या काळाबद्दल म्हणाली, मी ६-७ वर्षं अभिनय क्षेत्रात काम करत होते. त्यावेळी मी जाहिरातीत काम करीत होते. त्यावेळी मला चेकने पैसे मिळायचे. त्यावेळी मला माहीत नसायचं की, माझा पुढचा पगार कोणत्या कामातून येणार आहे. मी मुंबईत राहायचे त्याकडे या दृष्टिकोनातून पाहिलं जायचं की, काही दिवस तिला मजा करू दे. मग ती परत येईल. लग्नाबाबत निम्रत कौर म्हणाली की, लग्नाबाबत विचार करण्यासाठी मला माझा वेळ हवा आहे. सध्या मी माझ्या करिअरवर लक्ष केंद्रित करीत आहे. आयुष्यात स्थिर होण्यासाठी तुम्हाला लग्न करण्याची गरज नाही. मला वाटतं की, लग्न झालेले लोक सगळ्यात जास्त अस्थिर असतात.